विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ रविवार दि. १६ जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२७ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

**सुविचार**

परीक्षा की घडी मनुष्य को महान बनाती है, विजय की घडी नहीं ।

# महाविकास आघाडी निवडणूकीसाठी सज्ज



मुंबई- राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम देताना महाविकास आघाडीने आगामी विधानसभा निवडणूक पूर्ण ताकतीने एकत्रित लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आज महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद झाली. पत्रकार परिषद बोलताना माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी आगामी विधानसभा निवडणूकही पूर्ण ताकदीने लढणार असल्याची घोषणा केली. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस आणि ठाकरे गटाकडून स्वबळाचा नारा देण्यात येत होता, त्याला त्यालाही पूर्णविराम मिळाला आहे. चव्हाण यांनी सांगितले की, आज तीन पक्षांची प्राथमिक बैठक झाली. ही बैठक विधानसभेची पूर्वतयारीच्या अनुषंगानेच होती. लोकसभेसाठी आम्ही ज्या पद्धतीने लढलो त्यापेक्षा अधिक ताकदीने लोकांचे प्रश्न मांडून विधानसभेमध्ये सुद्धा बदल करू, असा विश्वास पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला.

मविआच्या संयुक्त पत्रकार परिषदेसाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, संजय राऊत, जयंत पाटील, आदित्य ठाकरे, बाळासाहेब थोरात, जितेंद्र आव्हाड, खासदार अनिल देसाई, अरविंद सावंत, वंदना चव्हाण उपस्थित होत्या. यावेळी बोलतानु उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी भाजपसह मोदींचा चांगलाच समाचार घेतला. महाविकास आघाडीकडून निवडणुकीत मदत करणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष घटकांचे आभार मानण्यात आले.

उद्धव ठाकरे आणि शरद पवारांचा प्रत्येक मतदारसंघांमध्ये प्रचार

तत्पूर्वी, पृथ्वीराज चव्हाण बोलताना म्हणाले की ही पत्रकार परिषद महाराष्ट्र जनतेचा आभार मानण्यासाठी आहे. लोकशाही वाचवण्यासाठी महाराष्ट्रात जनतेने घवघवीत यश महाविकास आघाडीला मिळवून दिले. अनेक संघटनांनी छोट्या पक्षांनी वातावरण निर्मितीसाठी मदत केल्याचेही पृथ्वीराज चव्हाण यांनी विशेष करून नमूद केले. लोकशाही वाचवण्यासाठी जनतेने आम्हाला मत दिल्याचंही त्यांनी सांगितलं. प्रचंड धनशक्ती विरोधात ही निवडणूक आम्ही लढवली आणि यश मिळवल्याचं त्यांनी नमूद केले. या निवडणुकीच्या माध्यमातून शेतकरी बांधवांनी सुद्धा एक संदेश दिला आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयत्न सुद्धा झाला. मात्र, तो यशस्वी झाला नसल्याचेही पृथ्वीराज चव्हाण यावेळी म्हणाले. त्याचबरोबर उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी जवळपास प्रत्येक मतदारसंघांमध्ये प्रचार केल्याचा विशेष उल्लेख पृथ्वीराज चव्हाण यावेळी यांनी बोलताना केला.

(पान २ वर)

## वाणिज्य मंत्रालय ठरवणार कांद्याचे दर

मुंबई : प्रतिनिधी - लोकसभा निवडणुकीत पराभवाचे कारण ठरलेल्या कांदा प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत असल्याचे मत मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर यांनी व्यक्त केले. कांद्यासंदर्भात नाफेड आणि एनसीसीएफचे अधिकार गोठवले आहेत. कांद्याचे दर आता थेट वाणिज्य मंत्रालय ठरवणार असल्याचे जयदत्त होळकर म्हणाले.

कांद्याला बाजार समितीपेक्षा कमी दर नाफेड आणि एनसीसीएफ देत असल्याने शेतक-यांनी नाराजी व्यक्त केली होती. केंद्र सरकारकडून नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून कांदा खरेदी करीत होते. याआधी कांद्याचे दर एनसीसीएफ आणि नाफेडकडून ठरवले जात होते.

यावर्षी केंद्र सरकारने पाच लाख (पान २ वर)

# अर्थसंकल्पासमोर नवीन आव्हाने

नवी दिल्ली : नुकताच मोदी सरकारचा किंबहुना एनडीए सरकारचा तिसरा कार्यकाळ सुरू झाला असला तरी. गेल्या दोन निवडणुकांप्रमाणे या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. देशातील वाढती महागाई आणि बेरोजगारी हे यामागचे एक कारण मानले जात आहे. अशा परिस्थितीत २०२४-२५ या अर्थसंकल्पात सर्वसामान्यांना दिलासा देणारे निर्णय घेणे हे नव्याने स्थापन झालेल्या सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान असेल. नव्या सरकारमध्येहि अर्थ मंत्रालयाची जबाबदारी पुन्हा एकदा निर्मला सीतारामन यांच्याकडे देण्यात आली आहे. त्याच्या आर्थिक अजेंडामध्ये देशाला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवणे आणि २०४७ पर्यंत भारताला 'विकसित राष्ट्रा'मध्ये रूपांतरित करण्यासाठी सुधारणांना गती देणे यांचा समावेश असेल की सर्वसामान्यांना महागाईतून दिलासा देणे असेल हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

मंत्रालयानेही बजेटवर काम सुरू केले आहे. या अर्थसंकल्पात विशेष काळजी घेतली जाईल की यावेळी सरकार वित्तीय तूट जीडीपीच्या ५.१ टक्के ठेवेल किंवा आरबीआयकडून प्राप्त झालेल्या २.१ ट्रिलियन रुपयांच्या लाभांशाने वित्तीय तूट सुधारली जाईल. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तिस-यांदा स्थापन झालेल्या २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात युतीचा परिणाम दिसू शकतो, अशी अटकळ बांधली जात आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पीएम मोदी म्हणाले होते की, जर त्यांचे सरकार तिस-यांदा सत्तेवर आले तर त्यांचे प्राधान्य भारतीय अर्थव्यवस्थेला असेल. सध्या अर्थव्यवस्थेच्या गतीबाबत सरकार मागे हटण्याच्या मनस्थितीत दिसत नाही.

निवडणुकीच्या निकालानंतरही जनतेला संबोधित करताना, पंतप्रधान मोदी म्हणाले होते की २०४७ पर्यंत भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि विकसित राष्ट्र बनवण्याचे त्यांच्या पक्षाचे लक्ष्य आहे. यंदाच्या पूर्ण अर्थसंकल्पात मोदी सरकार देशातील महिला, शेतकरी आणि तरुणांसाठी काही नवीन आणि मोठ्या घोषणा करू शकते.

फेब्रुवारी २०२४ मध्ये लखपती दीदींचे लक्ष्य ३ कोटी पर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते. आतापर्यंत देशात १ कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्यात आले आहे. टन कांदा खरेदी करण्याचे जाहीर केले होते. हा कांदा नाफेड आणि एनसीसीएफच्या मार्फत खरेदी केला जातो.

याशिवाय, पीएम गती शक्ती योजनेंतर्गत ३ नवीन कॉरिडॉर तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, याशिवाय येत्या १० वर्षात विमानतळांची संख्या १४९ वर पोहोचली आहे.

## सिरिल रामाफोसा दुसऱ्यांदा झाले आफ्रिकेचे अध्यक्ष

जोहान्सबर्ग : दक्षिण आफ्रिकन संसदेने पुन्हा एकदा सिरिल रामाफोसा यांची पाच वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्ष म्हणून निवड केली आहे, त्यांच्या आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (एएनसी) ला वर्षभरापूर्वी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत केवळ ४० टक्के मते मिळाली आहेत.

रामाफोसा यांनी आर्थिक स्वातंत्र्यसैनिकांचे नेते ज्युलियस मालेमा यांच्यावर मोठा विजय मिळवला. रामाफोसा यांना २८३ तर मलेमा यांना केवळ ४४ मते मिळाली. रामाफोसा लवकरच आपल्या मंत्रिमंडळाची घोषणा करतील अशी शक्यता वर्तवली जात आहे. शुक्रवारी रात्री निवडणुकीचा निकाल लागताच अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या निवडणुकीच्या घडामोडीला आता पूर्णविराम मिळाला आहे.

रामाफोसा यांनी कृतज्ञता केली व्यक्त

दरम्यान, अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर रामाफोसा म्हणाले की, नॅशनल असेंब्लीचे सदस्य या नात्याने तुम्ही मला दक्षिण आफ्रिकेच्या प्रजासत्ताकाच्या राष्ट्राध्यक्षपदी (पान २ वर)

## पहिल्याच दिवशी विद्यार्थी गणवेशापासून वंचित

पुणे : प्रतिनिधी- १५ जूनपासून राज्यातील शाळा सुरू झाल्या. सरकारने ठरवलेल्या धोरणानुसार ङ्गएक राज्य एक गणवेशफ असे धोरण आहे. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्याला राज्य सरकार शिवलेला ड्रेस पाठवणार होते, यासंबंधी राज्य सरकारने आदेशही काढले होते. मात्र आज शाळेचा पहिला दिवस आहे, पण प्रत्यक्षात अजूनही हे शक्य झालेले नाही. यामुळे राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक मिळून जवळपास ४८ लाख विद्यार्थ्यांना गणवेश मिळालेला नाही.

दरम्यान, राज्य सरकार ठरल्यानुसार ड्रेस शिवून पाठवणार होते. मात्र ते शक्य झाले नाही. त्यानंतर स्थानिक पातळीवर ड्रेस शिवून घ्या, त्यासाठी लागणारे कापड राज्य सरकार पाठवणार असे नव्याने सांगण्यात आले.



त्यानंतर ते बचत गटांकडून शिवून घ्या असे सांगण्यात आले. मात्र ते कापडही अजून पोहोचू शकले नाही. त्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशी आज राज्यातील प्राथमिक आणि माध्यमिक मिळून जवळपास ४८ लाख विद्यार्थ्यांना गणवेश मिळू शकणार नाही. त्यामुळे शाळेचा पहिला दिवस या विद्यार्थ्यांचा जुना शालेय गणवेशावर साजरा होणार आहे. तर ज्या विद्यार्थ्यांकडे गणवेश नाही ज्यांचा फाटला असेल त्यांना आता गणवेशाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

राज्यातील सर्वच सरकारी शाळांसाठी हा आदेश लागू करण्यात आला आहे. मोफत शिक्षणाच्या कायद्यानुसार १४ वर्षांपर्यंत सर्वच मुलांना मोफत शिक्षण, मोफत पुस्तके, मोफत गणवेश द्यावा लागतो. मात्र पहिल्याच दिवशी या सगळ्याचा बट्ट्याबोळ झाल्याचे चित्र आपल्याला दिसते. अगदी संभाजीनगरचा विचार केला तर (पान २ वर)


## मुंबईतील महाविद्यालय हिजाब बंदीवर ठाम विद्यार्थिनींची थेट न्यायालयात धाव

मुंबई : चेंबूर येथील महाविद्यालयाने प्लेसमेंटची वाढ आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी हिजाब आणि बुरखाबंदी करण्यात आली आहे. विद्यार्थी बुरख्यात नोकरी शोधायला गेले तर त्यांचा विचार केला जाईल का? समाजात कसे राहायचे आणि कसे वागायचे याबाबतचे मूल्य आणि शिष्टाचार विद्यार्थ्यांनी आत्मसात केले पाहिजे, यासाठी हिजाब बंदीचा निर्णय घेतला असल्याचे आचार्य कॉलजने स्पष्ट केले होते. मात्र याप्रकरणाबाबत निर्णयाविरोधात नऊ विद्यार्थिनींनी याचिका दाखल केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, काही महिन्यांपूर्वी चेंबूरमधील एन. जी. आचार्य आणि डी. के. मराठे महाविद्यालयात विद्यार्थिनींनी थेट मुंबई हायकोर्टात धाव घेतल्याचे समोर आले आहे. महाविद्यालयाच्या हिजाब, नकाब आणि बुरखा बंदी करण्यात आली होती. या निर्णयाला घेऊन विद्यार्थ्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. कॉलेजच्या चौकटीत झालेला हा निर्णय रद्द करण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यानंतर न्यायमूर्ती एस. एस. चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठांसमोर वकील अल्ताफ खान यांनी याचिका सादर केली. आता या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात १९ जून रोजी (पान २ वर)

# नीट परीक्षेचे पावित्र्य धोक्यात येणे चिंताजनक



लातुर /प्रतिनिधी- नीट परीक्षेच्या निकालातील गोंधळामुळे संपूर्ण देशातील शैक्षणिक क्षेत्र हादरून गेले असून या परीक्षेतील पावित्र्य धोक्यात आल्याने विद्यार्थी वर्ग भविष्याच्या चिंतेने ग्रासला गेला आहे. शासनाने या परीक्षेतील गैरप्रकार तातडीने शोधून काढून अभ्यासू आणि कष्टाळू विद्यार्थ्यांना अश्वस्त करणे आवश्यक बनले असल्याचे माजी वैद्यकीय शिक्षण तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आ.अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे.

माजी वैद्यकीय शिक्षण तथा संस्कृती कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या संदर्भाने प्रसिद्ध दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नियोजित वेळेपूर्वी घाई गडबडीत ऐन लोकसभा निवडणुकीच्या निकाला दिवशीच नीट परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या निकालात तब्बल ६७ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी म्हणजे ७२० मार्क मिळाल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. त्यात १५६३ विद्यार्थ्यांना ग्रेस गुण दिल्याची माहिती पुढे आली आणि त्यानंतर एका पाठोपाठ या परीक्षेतील अनेक गैरप्रकार उघड होत आहेत. एकंदरीत या परीक्षेचे पावित्र्यही आता धोक्यात आल्याची भावना सर्वत्र निर्माण झाली आहे. परिणामी देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे आणि संतापाचे वातावरण तयार झाले आहे.

डॉक्टर बनून रुग्ण सेवा करण्याच्या उद्देशाने दरवर्षी प्रचंड मेहनत आणि कष्ट करून विद्यार्थी ही नीटची परीक्षा देतात. यावर्षी देशातील २३ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती.या परीक्षेच्या निकालात गोंधळ झाल्याचे उघड झाल्यानंतर गुजरात,हरियाणा,बिहार यासह इतर अनेक राज्यात पेपर फुटीचे प्रकारही आता पुढे आले आहेत.त्यामुळे परीक्षा दिलेल्या आणि भविष्यात ही परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्यात तर या परीक्षेला अनन्यसाधारण महत्त्व आहे, येथील वैद्यकीय सेवेचा (पान २ वर)

## ज्ञानाचा उपयोग चांगला समाज घडविण्यासाठी व्हावा: गुरुबाबाबा महाराज औसेकर



औसा (प्रतिनिधी) विश्वेश्वर शिक्षण प्रसाक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुल, विश्वेश्वरपूरम् लातूर येथे चालू शैक्षणिक वर्षापासून सुरुवात केलेल्या विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलच्या ज्ञानयज्ञाच्या पवित्र कार्याच्या शुभारंभावेळी ज्ञान हेच समाजातील व्यक्तीला परीपुर्ण बनविण्याचे कार्य करते जसे ज्ञान दिल्याने वाढत जाते त्याच प्रमाणे विश्वेश्वर शिक्षण संस्थेतून ज्ञान दानाचे कार्य मागील दोन दशकापासून अविरतपणे व अत्यंत चांगल्या प्रकारे होत आहे. त्याची फलश्रुती महत्वाची आहे या ज्ञान यज्ञातून धाराशिवे परीवाराच्या संकल्पातून चांगला समाज निर्माण व्हावा व या संकल्पाचे वटवृक्षात रुपातंर व्हावे आणि त्यातून मिळण्याऐया ज्ञानाचा उपयोग चांगला समाज घडविण्यासाठी व्हावा असे प्रतिपादन सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांनी केले.

लातूर येथे सर्व सुविधानियुक्त अशा विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलचा शुभारंभ औसा येथील नाथ संस्थानचे पीठाधिपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते व ष.ब्रा. १०८ काशिनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी माजी आ. वैजनाथ शिंदे, धनंजय देशमुख, अशोकराव गिरवलकर व संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवराज धाराशिवे, (पान २ वर)

# डॉ.शिवाजीराव काळगे यांनी अहमदपूरकरांचे मानले आभार



अहमदपूर / प्रतिनिधी- या शहरासह तालुक्यातील मतदार , कार्यकर्ते , हितचिंतक यांनी अतिशय मेहनत घेऊन महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजीराव काळगे यांना विजयी केल्याबद्दल भारतीय काँग्रेस पक्ष ,राष्ट्रवादी शरद पवार गट व उबाठा शिवसेना गटातील सर्व पाठीराखे यांचे आभार मानण्यासाठी दौरा करून नवनिर्वाचित खासदार यांनी मानले सर्वांचे मनापासून आभार.

येथील शासकीय विश्रामगृह येथे काँग्रेस ,राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेस , सर्व कार्यकर्ते , हितचिंतक यावेळी उपस्थित होते. मात्र शिवसेनेचे कोणी प्रमुख किंवा कार्यकर्ते दिसले नाहीत. यावेळी नवनिर्वाचित खासदार शिवाजीराव काळगे यांचे आगमन होताच फटाके फोडून, बँड वाजवत त्यांचे स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी माजी मंत्री विनायकराव पाटील ,विक्रांत गोजमगुंडे, विजय देशमुख , सय्यद इमरान ,डॉक्टर ह भ प पांडुरंग महाराज कदम आदींसह कार्यकर्ते ,पदाधिकारी उपस्थित होते.

येथील शासकीय विश्रामगृह येथे ड.आर डी शेळके , शिराजोद्दीन जहागीरदार काँग्रेस कार्याध्यक्ष ,भारत रेड्डी ,विकास महाजन शहराध्यक्ष काँग्रेस , राजीव पाटील ,सोमेश्वर कदम, सय्यद साजिद , सुधीर गोरटे , रामभाऊ बेल्लाळे अध्यक्ष राशप, भाग्यश्री क्षीरसागर ,माधवराव पाटील ,शहाजी पाटील ,राहुल शिवपुजे , चेअरमन शिवकुमार कदम , शिवानंद भोसले ,विलास (पान २ वर)

# शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण



**मुलांच्या नावे घराच्या परिसरात वृक्षारोपण करावे : जिल्हाधिकारी**

लातूर जिल्ह्यात वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धन मोहिमेत प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक असून विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल, वृक्ष लावून या उपक्रमात इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावे एक झाड लावण्यात येत आहे. याप्रमाणेच प्रत्येक नागरिकाने एक मुल, एक वृक्ष या संकल्पनेतून आपल्या प्रत्येक मुलाच्या नावे घराच्या परिसरात एक झाड लावून आपल्या मुलांच्या वाढदिवसादिवशी या झाडांचाही वाढदिवस साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांकडे वृक्ष लागवडीचा आग्रह धरावा आणि झाडे लावण्यास सांगावे, असे त्या म्हणाल्या.

लातूर, दि. १५ : जिल्ह्यात माझं लातूर, हरित लातूर उपक्रमातून वृक्ष लागवड मोहिमेला गती देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून शाळेतील पहिले पाऊल, वृक्ष लावून हा उपक्रम राबविण्यात आला. इयत्ता पाहिलेमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते आज शाळेच्या पहिल्याच दिवशी वृक्षारोपण करण्यात आले. लातूर तालुक्यातील वरवंटी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील कार्यक्रमाला जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी उपस्थित राहून या उपक्रमात सहभाग नोंदविला.

शाळा प्रवेशोत्सव आणि वृक्षारोपणासाठी आयोजित कार्यक्रमात इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची सजवलेल्या बैलगाडीतून उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी या बैलगाडीचे सारथ्य केले. शाळेच्या प्रवेशद्वारावर वाद्यांच्या गजरात शिक्षकांनी या मुलांचे औक्षण करून आणि गुलाबपुष्प देवून शाळेमध्ये स्वागत केले. या विद्यार्थ्यांच्या हस्ते आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीच्या वर्गात नेवून त्यांची नाव नोंदणी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांशी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी संवाद त्यांना शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देवून त्यांना विविध क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी योग्य मार्गदर्शन करावे, असे सांगितले. तसेच त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचेही वाटप करण्यात आले.

इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातून, त्याच्या नावे शाळेच्या परिसरात एक झाड लावण्याचे, तसेच विद्यार्थ्यांच्या वाढदिवसाला या झाडाचाही वाढदिवस साजरा व्हावा, असे आवाहन जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये आज पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल, वृक्ष लावूनफ हा उपक्रम राबविण्यात आला. जिल्ह्यातील शाळांमध्ये जवळपास १६ हजार विद्यार्थी इयत्ता पहिलीत प्रवेश घेत असून त्यांच्या हातून वृक्षारोपण करण्यात येत असल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गिरी यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, (पान २ वर)



# रणसम्राट प्रतिष्ठाणच्यावतीने टोपी वाटपाचा कार्यक्रम संपन्न

लातूर : रणसम्राट प्रतिष्ठाणच्यावतीने उन्हाची तीव्रता लक्षात घेता टोपी वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

रणसम्राट युवक प्रतिष्ठाण लातूर यांच्यावतीने वाढत्या उन्हाची तीव्रता लक्षात घेता व उन्हापासुन लोकांचे संरक्षण व्हावे या उद्देशाने टोपी वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. रणसम्राट युवक प्रतिष्ठाणचे अध्यक्ष यावेळी म्हणाले की, यावर्षी उन्हाची तीव्रता जास्त आहे. नागरीकांनी आपली कामे सकाळच्या सत्रात व दुपार नंतर बाहेर कामासाठी पडावे जास्तीत पाणी प्यावे तसेच थंड पदार्थाचा जास्तीत जास्त आहारात वापर करावा घरी बाहेर निघताना टोपी किंवा गमज्याचा वापर करावा. यावेळी प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष राचण्णा वांगी, सचिव दयाणंद कलशेट्टी, प्रदेश अध्यक्ष महेश ढोले, सहसचिव अजय शिराळ, प्रदेश सचिव विशाल भडंगे, प्रवक्ते ज. रा. शिंदे, प्रविण साळुंके, प्रसाद वाघमारे, संकेत बामणकर, ओम सराफ, जाधव, बुरशे, संतोष भोसले, शिवा पैळ, मारोती पिटले, अभिषेक गायकवाड, पवण बलदवा, आकाश बनसोडे, ओमकार भडंगे, बबलु आंबेकर, भालेराव सरवदे, श्रीनिवास, मोहन गायकवाड, अविनाश गोखले, सुशिल जगताप, सोहेल शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी वैदयकिय व अभियांत्रिकी प्रवेशपूर्व परिक्षा वर्गाचा लाभ घ्यावा : प्राचार्य डॉ मोहन खताळ

देगलूर(प्रतिनीधी):येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालय देगलूर तर्फे ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेची तयारीसाठी कोटा राजस्थान येथील तज्ञ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून दिली आहे .

तरी विद्यार्थ्यांनी याचा विशेष असा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांनी केले . ते देगलूर महाविद्यालयात दिनांक १० जून पासून वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेची संपूर्ण तयारी करून घेण्याकरिता मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्गासाठी कोटा राजस्थान येथील तज्ञ प्रा.जे. पी.चंद्रा ,रवी कुमार पाल तसेच प्रणेश कुमार गौतम; मुकेश सर यांना पाचारण करण्यात आले आहे. त्यांनी प्रत्यक्ष वर्ग घेण्यास महाविद्यालयात सुरू केले आहेत त्यांचा या निमित्ताने सत्कार समारंभ आज दिनांक ११ जून रोजी घेण्यात



आला .यावेळी अध्यक्ष स्थानावरून प्राचार्य डॉ. खताळ सर बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य उत्तम कुमार कांबळे कोटा राजस्थान येथील मा.चंद्रा रवी कुमार पाल; प्रणेश कुमार गौतम आणि मुकेश यांची उपस्थिती होती.

यानंतर रवी कुमार पाल यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेश पूर्व शिक्षणा मागची भूमिका आणि अभ्यासाचे तंत्र याविषयी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या वर्गासाठी प्रवेश घ्यावा असे आवाहन केले.

तसेच सत्कार समारंभाच्या मार्गदर्शन प्रसंगी उपप्राचार्य उत्तम कुमार कांबळे यांनी ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी देगलूर महाविद्यालयाने नांदेड ;लातूर व इतर ठिकाणी न जाता विद्यार्थ्यांनी आपल्या शहरांमध्ये वैद्यकीय तसेच अभियांत्रिकी प्रवेश पूर्व परीक्षेच्या तयारीसाठी देगलूर महाविद्यालयाने सोय करून दिली आहे पुढील जीवनात यशस्वी होण्यासाठी या वर्गासाठी प्रवेश घेऊन लाभ घ्यावा असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पर्यवेक्षक प्रा.संग्राम पाटील यांनी मानले

या कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थी तसेच प्रा.डॉ व्ही जी शेरीकर ;प्रा.गजानन कोकडवार प्रा. हनुमंत वाकडे प्रा. भुसाळे राजेन्द्र प्रा. दासरवाड प्रा.तुकाराम लागले प्रा. महेश कुलकर्णी ; शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते

## त्र्यंबक कांबळे यांचे निधन



शिरूरआनंतपाळ / प्रतिनिधी: जुन्या हेर राखीव मतदार संघाचे माजी आमदार त्र्यंबक पांडुरंग कांबळे वय ८२ यांचे हृदयविकाराच्या धक्याने सांयकाळी चार वाजता लक्कडजवळगा येथे निधन झाले. त्यांच्या पश्र्चात तीन विवाहीत मुले एक मुलगी सुना नातवंडे असा परिवार असुन त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या मुळगावी लक्कडजवळगा ता.शिरुरआनंतपाळ येथे सकाळी आकरा वाजता अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. आ.टी.पी,कांबळे हे पुर्वीच्या हेर ता.उदगीर या राखीव मतदार संघाचे सन् १९७६ ते १९७८ व २००५ ते २००९ पर्यंत आमदार म्हणुन होते. तर येरोळ जि.प.गटाचे माजी सदस्य राजीव कांबळे यांचे वडील होते.

# शेतकरी संघटनेच्या वतीने देवणी येथे रस्ता रोको आंदोलन

लातूर / प्रतिनिधी- शेतकरी संघटनेच्या वतीने देवणी येथे आनंद जीवने उर्फ पृथ्वीराज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांचा पीक कर्जाचा व्याज परतावा मिळावा., पिक विमा ३वर्षा पासून चां मिळावा आठ तास दिवसा लाईटमिळावे व, सीएससी सेंटरवर विमा भरण्यासाठी अनधिकृत पणे दोनशे रुपये आकारले जात आहे, तो थांबावे व खतांचा तुटवडा आहे ते सुरळीत करून शेतकऱ्याला खत मिळावे व चढ्या भावाने देऊ नये अन्यथा त्यांच्यावरती कारवाई करावी असे शेतकऱ्यांचे अनेक प्रश्र्न सोडवण्यासाठी शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे . या आंदोलनास शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सुरेंद्र काशिनाथ अंबुलगे, युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष मिथुन दिवे ,लातूर जिल्हा अध्यक्ष गजानन बोळंगे, जील्हा कार्याध्यक्ष संजय देवप्पा,देवणी तालुकाध्यक्ष विकास नमनगे व योगेश तगरखेडे श्रीमंत अण्णा लुल्ले करीम भाई शेख चेतन मिटकरी शेतकरी संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत तरी शेतकरी संघटनेच्या वतीने विविध पक्षातील कार्यकर्ते व पदाधिकारी यांना नम्र विनंती आहे की शेतकऱ्यांच्या प्रश्र्न सोडवण्यासाठी या आंदोलनामध्ये उपस्थित राहून सहकार्य करावे व परिसरातील सर्व शेतकरी बांधव या कार्यक्रमास उपस्थित राहावे ही शेतकरी संघटनेच्या वतीने नम्र विनंती.



**दिलासा फाउंडेशन लातूर द्वारा आयोजित दिलासा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा २०२४ साठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहुन समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना ॲड. प्रवीण हणमंतराव पाटील अध्यक्ष , लातूर जिल्हा काँग्रेस (विधी विभाग) तथा अध्यक्ष, आधार फाउंडेशन, धनेगाव यांनी पुरस्कार देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी दिलासा फाउंडेशन चे अध्यक्ष श्री.दयानंद बिराजदार, व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.**

सध्या नीट परीक्षेतील गोंधळाचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे हे जरी खरे असले तरी महाराष्ट्र शासनानेही राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यावर अन्याय होणार नाही याची हमी देणे आवश्यक आहे.

यूपीएससी,एमपीएससी पासून, विविध खात्यांच्या भरती प्रक्रियेत पेपर फुटी आणि गैरप्रकार झाल्याच्या घटना ताज्या आहेत,त्यात आता नीट परीक्षेचे पावित्र्यही संपुष्टात आल्याचे दिसून येत आहे त्यामुळे एकंदरीत सर्व प्रकारच्या परीक्षा आणि नोकर भरतीची प्रक्रिया पारदर्शक बनवणे अनिवार्य बनले आहे. त्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू करून त्यासंबंधीची माहिती प्रसारित करणे गरजेचे असल्याचेही आमदार अमित विलासराव देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### ज्ञानाचा उपयोग...

सहसचिव महादेव खिचडे, चंदू बिराजदार, सुदर्शन बिराजदार, जयशंकर हुरदळे, सिध्दलिंग निलंगेकर, विश्वनाथ निलंगेकर, अलकनंदा धाराशिवे, विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, योगेश धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, शिवकांता धाराशिवे, दिपमाला धाराशिवे, मेघा धाराशिवे, डॉ. अनुराधा धाराशिवे व शुभांगी धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेज चे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, विश्वेश्वरय्या औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्या स्वाती कापसे व विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलचे प्राचार्य अंकुश बिडवे, सोनू डगवाले, डॉ. गोपीकिशन भराडिया, संगमेश्वर ठेसे, शिरीष उटगे, सुभाष बिराजदार, आलमला गावचे चेअरमन विश्वनाथ बिराजदार, माजी सरपंच कैलास निलंगेकर, बालाजी पिंपळे, चंद्रशेखर दंडिमे, सुनिल मिटकरी इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

प्रास्ताविकात संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांनी संस्थेने केलेल्या यशस्वी शैक्षणिक प्रगतीचा चढता आलेख सांगून विश्वेश्वरय्या पब्लिक स्कुलमध्ये दिल्या जाणाऐया अत्याधुनिक डीजीटल सोयी सुविधा, सुसज्ज ग्रंथालय, मॉर्डन क्लासरुम व विद्याथ्र्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऐया विविध उपक्रमांची माहिती दिली.

ष.ब्रा. १०८ काशिनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर यांनी संस्थेने आलमला येथील यशस्वी वाटचालीनंतर लातूरात सुरु होत असलेले संकुल प्रगतीच्या शिखरावर नक्कीच जाईल असा विश्वास व्यक्त करुन पुढली वाटचालीस शुभाशिर्वाद दिले. सदरील कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. सुरज मालपानी यांनी केले तर आभार प्राचार्य अंकुश बिडवे यांनती मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेत अंतर्गत कार्यरत असलेल्या सर्व युनिटमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

### डॉ.शिवाजीराव...

पाटील काळेगावकर, शिवराज चोथवे ,खंडेराव शेवाळे ,बाबुराव कन्हाळे, इसाक अकोले ,राम नरवटे ,अमोल तरडे ,केदार काळवदे ,सद्दाम पठाण ,बालाजी देवकते ,जराण पठाण ,समीर पठाण , मुन्ना पठाण , प्रकाश ससाणे , श्रीकांत बनसोडे आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून सर्वांनी नवनिर्वाचित खासदार शिवाजीराव काळगे यांचा सन्मान केला.

### शाळेच्या...

उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, प्राथमिकचे उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, वरवंटीचे सरपंच पवन जाधव, उपसरपंच राजेश पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसवेश्वर लांडगे, उपाध्यक्ष रमा कांबळे, ग्रामसेवक अशोक लामदाडे, मुख्याध्यापक रामेश्वर गिल्डा यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक व पालक यावेळी उपस्थित होते.

## पान १ वरून

### महाविकास...

पुढील निवडणूक सुद्धा एकत्रित लढणार : उद्धव ठाकरे

दरम्यान, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले की, आज आमची एक बैठक झाली. पुढील निवडणूक सुद्धा एकत्रित लढणार आहोत. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र जनतेचे आभार मानतो. युट्युब आणि संघटनानी सुद्धा विचार मांडले. संविधान आणि लोकशाही वाचविण्यासाठी ही लढाई होती.

तेवढा आम्हाला फायदा होईल, शरद पवारांचा टोला

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले की, देशाच्या पंतप्रधान मोदी यांनी राज्यात १८ सभा घेतल्या. एक रोड शो सुद्धा झाला. विधानसभेला सुद्धा जेवढ्या त्यांच्या सभा होतील तेवढा आम्हाला फायदा होईल, अशा शब्दात शरद पवार यांनी पीएम मोदी यांच्या प्रचारसभांवरून टोला लगावला.

महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राज्यातील जनतेचे आभार मानले. यावेळी त्यांनी छोट्या मोठ्या संघटनांचे सुद्धा आभार मानले. त्यांनी सांगितले की, लोकसभेला घवघवीत यश महाविकास आघाडीने मिळवल्यानंतर पहिल्यांदा सर्व नेते एकत्रित तुमच्यासमोर येत आहेत. विविध संघटना आणि घटक पक्ष, निर्भय बनो संघटनांनी प्रचारामध्ये सहकार्य केलं. महाराष्ट्रामध्ये जनजागरण केलं त्याबद्दल त्यांचे आभार. त्यांच्यामुळे हे मोठं यश महाराष्ट्रामध्ये मिळालं असल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्रामध्ये एखादा पक्ष किती खर्च करू शकतो, हे आपण बघितलं तरी आम्हाला ३१ जागा मिळणं हे मोठं यश आम्हाला प्राप्त झालं असल्याचे त्यांनी सांगितले.

### वाणिज्य...

कांद्याचा दर हा नाफेड आणि एनसीसीएफच्या मार्फत ठरवला जातो. मात्र, आता कांद्याचे दर ठरवण्याचे अधिकार ग्राहक संरक्षण मंत्रालयाने स्वत:कडे ठेवले आहेत. त्यामुळे नाफेड आणि एनसीसीएफच्या मार्फत कांदा खरेदी करताना दररोज जो दर जाहीर होत होता तो दर आता आठ दिवसाला जाहीर होणार आहे. हा दर दिल्लीतून ग्राहक संरक्षण मंत्रालय ठरवणार आहे.

### सिरिल...

निवडून देण्याचा निर्णय घेतला याबद्दल मी अभिमानास्पद आणि सन्मानित आहे. आपल्या जीवनातील हा एक ऐतिहासिक क्षण असून, आपल्या देशासाठी आपल्या सर्वांनी एकत्र काम करावे लागेल, असे रामाफोसा यांनी म्हटले.

### पहिल्याच...

संभाजीनगर जिल्ह्यात दोन हजारांवर जिल्हा परिषद शाळा आहेत. मात्र कापड यायला अजून किमान एक महिना लागेल. त्यानंतर शिवायला काही दिवस लागतील, असे जिल्हा परिषदेच्या सीईओंनी सांगितले आहे. शासनाच्या धोरणानुसार १२०० बचत गट निवडले आहेत. मात्र कापड आल्यावरच ते शिवता येतील असे जिल्हा परिषद सीईओंचे म्हणणे आहे. तर पालक संघटना शासनाचा हा निर्णय चुकीचा असल्याचे सांगत आहेत. जुन्या पद्धतीने एका ड्रेससाठी चारशे रुपये मिळायचे. शालेय समिती स्थानिक पातळीवर कापड खरेदी करायची. गणवेश शिवून विद्यार्थ्यांना द्यायचे हीच पद्धत योग्य असल्याचे पालक संघटना सांगत आहेत. शासनाने नियम बदलला, मात्र अंमलबजावणी न झाल्याने या विद्यार्थ्यांचा पहिला दिवस मात्र जुन्याच गणवेशावर उजाडला आहे.

### मुंबईतील...

सुनावणी होणार आहे.

दरम्यान, आजपासून २०२४-२५ शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. या निर्बंधामुळे आपल्याला महाविद्यालयात प्रवेश नाकारण्यात येईल, याची भीती विद्यार्थिनींना वाटत आहे. तसेच महाविद्यालयाच्या आवारात पोलिसांचा बंदोबस्त देखील तैनात करण्यात आलेला आहे. महाविद्यालय प्रशासनाच्या या निर्णयामुळे विद्यार्थिनींमध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे आता १९ जून रोजी होणाऱ्या सुनावणीत मुंबई हायकोर्ट काय निर्णय देणार, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

### नीट परीक्षेचे...

लौकिक जगभरात पसरलेला आहे त्यामुळे,राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये डॉक्टर होण्याकडे मोठा कल आहे, राज्यात आणि देशात शिक्षणाचा आदर्श पॅटर्न निर्माण करणाऱ्या लातूर मध्ये दरवर्षी हजारो विद्यार्थी खूप मोठी तयारी करून नीट ची परीक्षा देतात,त्यामुळे दरवर्षी राज्यात वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळवणारे सर्वाधिक विद्यार्थी लातूरचे असतात, अलीकडच्या काळात मराठवाड्यातील नांदेड, छत्रपती संभाजीनगर,धाराशिवसह राज्यात सर्वत्र या पॅटर्नचे अनुकरण होत आहे. अथक परिश्रम करून गुणत्तेच्या जोरावर या परीक्षेत यश मिळवण्याची खात्री बाळगून असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नीट परीक्षेतील गोंधळामुळे चिंतेचे वातावरण आहे,

## जाहीर प्रगटन

उदगीर शहर व परिसरातील सर्व नागरीकांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविले जाते की, माझे अशिल मे. उदयगिरी मल्टिस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी लि. उदगीर ही उदगीर परिसरात कार्यरत पतसंस्था असून गरजू व्यक्तींना अर्थ सहाय करते.

राजगोपाल ओमप्रकाश मनियार रा.डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, लक्ष्मीनारायण मंदिर जवळ, तळवेस गल्ली उदगीर यांनी माझ्या अशिल पतसंस्थेत त्यांच्या वैयक्तिक, व्यावसायीक वृध्दी करिता कर्ज रक्कम रु.५०,००,०००/- (अक्षरी रूपये पन्नास लाख फक्त) घेतले असून नमुद कर्जाकरिता त्यांनी त्यांच्या मालकी ताब्यातील (भोगवटा) मधील उदय गृह निर्माण सह संस्था नांदेड रोड येथील न.प. मिळकत नं. ४-३-५८७ जुने ४-३-५८८ नवे क्षेत्र पुर्व पश्र्चिम ५० फट, दक्षिण उत्तर ६० फुट ज्याची चतुः सिंमा :

पुर्वेस :-गचके यांचे घर
पश्र्चिमेस:-रस्ता
दक्षिणेस:-शिवाबाई वर्धमान यांचे घर
उत्तरेस:-पटवारी यांचे घर

तसेच

दुकान न.प.मिळकत नं. ५-२-३९९/१ क्षेत्र ११ ू १९ फुट ज्याची चतुःर्सिमा

पुर्वेस:-नंदकुमार मलशेट्टे
पश्र्चिमेस:--न.प.रस्ता
दक्षिणेस:- केदार शिवलिंग मलशेट्टे
उत्तरेस:-- नंदकुमार मलशेट्टे याचे दुकान

वरील मिळकती नोंदणीकृत गहाणखत नं. १००/२०१८ दिनांक ०८/०१/२०१८ अन्वये नमुद पतसंस्थेत तारण गहाण ठेवली असून न.प. अभिलेखात नमुद मिळकतीवर त्याबाबत कर्ज बोजाची नोंद केली आहे.

नमुद पतसंस्थेस असे निर्दशनास आले आहे की, सदर कर्जदारानी नमुद मिळकतीचे परस्पर विक्री करण्याच्या प्रयतनात असून त्याबाबत तसा विक्री करार इतराच्या हक्कात करारनामा आधारे करून दिला आहे. तरी संबंधीत व्यक्ती अथवा इतर जनतेस सुचविले जाते की, नमुद दोन्ही मिळकतीवर पतसंस्थेचा कर्ज बोजा असल्याने कर्ज परतफेड होई पर्यन्त कोणीही नमुद मिळकतीचे विक्री करारदस्त, खरेदीखत, भाडेपट्टा, बक्षीसपत्र अथवा इतर दस्त / व्यवहार करू नये तसे झाल्यास पतसंस्थेतर्फे केल्या जाणाऱ्या कायदेशर कार्यवाहीस व परिणामास ते स्वतः जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन
दिनांक १५/०६/२०२४

तर्फे
ॲड. सुरेश महालिंगप्पा मुदूडगे नगरेश्वर मंगल कार्यालयाच्या बाजूस चौबारा जवळ, उदगीर जि.लातूर
मो.नं.९४२३३५१६९२

**प्रगटन देणार**
व्यवस्थापक
उदयगिरी मल्टिस्टेट को.ऑप. क्रेडीट सो. उदगीर जि.लातूर

## टी.सी. हरवले आहे.

काळे करण लक्ष्मण कॉमर्सची १२ वी पास ची टी.सी गातेगा ते लातूर प्रवासात हरवले आहे.

व्यंकटेश माध्यम व उच्च माध्यमिक विद्यालय, गातेगांव.
मो. ९८६०५११२२६

## जाहीर प्रगटन

लातूर येथील ४ थे सह दि. न्या. व. स्तर, यांच्या न्यायालयात
वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत

किरकोळ दिवाणी अज क ९३५/२०२४
(विरभद्र) निशाणी क्रमांक. ६

ज्यापेक्षा त्रिंबकप्पा गुरूसिध्दअप्पा कोरे यांचा मृत्यु दि.०५.०६.२००३ रोजी आझाद चौक ता. जि. लातुर येथे झाला असून अर्जदार

विरभद्र शिवराजअप्पा कोरे वय ३६ वर्षे धंदा नोकरी रा.आजाद चौक पाठक गल्ली लातूर

मयताचे इतर वारस

१. उज्वला शिवराजअप्पा कोरे
२. अनुजा आनंद सलगरे
३. लता प्रभाकर वरवटे

यांनी मयताच्या पश्चात मयताचे कायदेशीर वारस या नात्याने शासकीय निमशासकीय कामासाठी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे त्यामुळे अर्जदार यांनी मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार हे सदरहु मयताचे कायदेशीर वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर दर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे वारसाबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा वारस शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचे वरील अर्जदार यांना कायदेशिर वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**तारीख १२ माहे ०६ सन २०२४**
**पु.ने.ता. २९.०६.२०२४**

**आदेशावरून**

**(जे. एस. पवार)**
क.लिपीक.
**सह दि.न्या.व.स्तर. लातूर**

**सहा. अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय व. स्तर, लातूर

## जाहीर प्रगटन

श्री. के. जी. चौधरी, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, लातूर यांच्या न्यायालयात

वारसा प्रमाणपत्र क्र. ९३४/२०२४
धर्मवीर वि. निरंक
निशाणी क्रमांक ०६

ज्यापेक्षा मयत रानबा तुकाराम सोदले यांचा दिनांक १६.१२.१९९६ रोजी कव्हा, ता.जि. लातूर येथे मृत्यू झाला. उपरोक्त प्रकरणात अर्जदार धर्मवीर रानबा सोदले व इतर वारस १. वैवशाला ज्ञानोबा सोदले, २. विठठल ज्ञानोबा सोदले, ३.गोविंद ज्ञानोबा सोदले, ४. अनुसया अभिमन्यु तिफनबाने, ५. शेषाबाई बब्रुवान भुसे, ६. पद्मावती बालाजी वंदे, ७. गोरखनाथ रानबा सोदले, ८. जयराज नवनाथ सोदले, ९. शामल जनार्धन घंटेवाड, १०. अंजना जयचंद सोदले, ११. मनोज जयचंद सोदले, १२ स्नेहा जयचंद सोदले, १३. शांताबाई गोरोबा मेळे, १४. सुकूमार गोविंदराव पेठकर यांनी मयत रानबा तुकाराम सोदले यांचे वारस असलेबाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांनी उपरोक्त प्रकणात मयत रानबा तुकाराम सोदले यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस घोषीत करुन तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नांव नोंदणी करण्यासाठी व ईतर कामासाठी त्यांच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे.

त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारीख १२.०६.२०२४
पुढील तारीख २२.०६.२०२४

**आदेशावरून**

**व्ही.जी. गायकवाड**
क.लिपीक

**सहा. अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय व. स्तर, लातूर

## टि.सी.हरवली आहे

माझी आश्विणी संजय उगीले या नावाची बारावी पासची मुळ टि.सी. व मार्कशीट ,१० व १२ सनद दि.१५/०५/२०२४ रोजी नावंदी ते उदगीर प्रवासात हरवली आहे कोणास सापडल्यास खालिल मो.नं.वर संपर्क साधावा
मो.नं.:--८९८३८४६८३८

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.१२/०६/२०२४

ज्याअर्थी अर्जदार सोनटक्के कपिलदेव शिवाजीराव वय ४१ वर्ष रा. करंजी ता. जळकोट जि. लातुर यांच्या मुलीच्या नामे सोनटक्के आस्था कपिलदेव यांचा जन्म मौजे करंजी ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ३०/०७/२०१८ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील सोनटक्के आस्था कपिलदेव यांचा जन्म दिनांक ३०/०७/२०१८ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सोनटक्के आस्था कपिलदेव यांचा जन्म दिनांक ३०/०७/२०१८ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु सोनटक्के आस्था कपिलदेव यांचा जन्म दिनांक ३०/०७/२०१८ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय करंजी ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १२/०६/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख १२/०७/२०२४

**तालुका दंडाधिकारी तथा**
तहसीलदार जळकोट

यशवंत
धाराशिव जिल्हा
रविवार दि. १६ जून २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## परंडा येथील उपजिल्हा रुग्णालय परिसरात वृक्षारोपण

परंडा दि.१५ (प्रतिनिधी) – येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये वृक्षा रोपण शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता साळुंखे, आरोग्य दुत बालाजी नेटके, गौतम लटके, बाळासाहेब गायकवाड, मनसे प्रमुख कसबे यांच्या हस्ते दि.१५ जून रोजी करण्यात आले.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी स्वप्रेरणेतून वृक्षा रोपण करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ.विश्वेश कुलकर्णी, सर्जन डॉ.वाघमारे, डॉ.अभिजित खरटमल, डॉ.दयानंद पाटील, डॉ.जयश्री यादव, डॉ.कोरबु, डॉ.आनंद मोरे, डॉ,हाश्मी, तानाजी गुंजाळ, अधिपरिसेविका केसकर, सुनिता कुलकर्णी, शिवगंगा गायकवाड, स्वाती चव्हाण, औषध निर्माण अधिकारी जितेंद्र ओव्हाळ, अधिपरिसेविका रुपाली सौताडेकर, ज्योऊजगदाळे, अनिल भोसले, किशोर जगताप, सहायक अधीक्षक चंद्रभान पवार यांनी वृक्षारोपण करण्यासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार डॉ.आनंद मोरे यांनी मानले.



# शिक्षकांनी विविध मागण्यांसाठी शाळेच्या पहिल्याच दिवशी केला आंदोलनरुपी शिमगा !

## शिक्षकांना शिकवू द्या... विद्यार्थ्यांना शिकू द्या

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर व्यपगत होणार आहेत. तर सेवानिवृत्त शिक्षकांना कमी पटाच्या शाळेत मानधनावर नियुक्त्या करण्याचा निर्णय पूर्णतः चुकीचा आहे. तसेच इयत्ता १ ते ५ व ६ ते ८ तसेच मुख्याध्यापकपदाचे नव निर्धारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनात अडसर निर्माण करणारे आहे. त्यामुळे तो निर्णय रद्द करण्यात यावा यासह इतर मागण्यांसाठी शाळेच्या पहिल्याच दिवशी दि.१५ जून रोजी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करीत शिमगा केला.

राज्य शासनाने संचमान्यता व शिक्षक निर्धारण संबंधाने दि. १५ मार्च रोजी निर्गत केलेल्या शासन निर्णयानुसार प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर व्यपगत होणार आहेत. तसेच सेवानिवृत्त शिक्षकांना कमी पटाच्या शाळेत मानधनावर नियुक्त्या करण्याचा निर्णय सुद्धा सर्वकष विचार करता पूर्णतः चुकीचा आहे. तसेच इयत्ता १ ते ५ व ६ ते ८ तसेच मुख्याध्यापकपदाचे नव निर्धारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनात अडसर निर्माण करणारे आहे. शिक्षकांच्या गणवेश संहितेचा निर्णय सुद्धा शिक्षकांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणारा असून शिक्षकांच्या प्रती अविश्वास निर्माण करणारा आणि समाजामध्ये शिक्षकांप्रती नकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारा आहे. तसेच नवभारत साक्षरता कार्यक्रमाच्या जबाबदारीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे दुर्लक्ष होते. तर दैनदिन अध्यापनाचे कार्य प्रभावित होते. हे मागील शैक्षणिक सत्रात सर्वांनी अनुभवले आहे. नवभारत साक्षरता कार्यक्रमासाठी १५ ते ३५ वयोगटातील प्रौढांचे सर्वेक्षण, शिकविणे आणि परीक्षा घेणे याबाबतची शिक्षकांना जबाबदारी देणे सर्व अनाकलनीय आहे. या कामामुळे शाळेतील ६ ते १४ वर्षे वयोगटाच्या विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अध्यापनावर विपरीत परिणाम होत असल्यामुळे हे काम शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदीस विसंगत आहे. तसेच शाळेत कोणतीही सुविधा न देता शिक्षकांच्या खाजगी मालकीच्या मोबाईलचा सर्रास वापर कार्यालयीन कामकाजासाठी करण्याची प्रशासनिक मानसिकता वाढत चालली असून त्या अशैक्षणिक कामाचा तगादा आणि वेळी अवेळी देण्यात येणाऱ्या



सूचना, माहिती मागण्याचा हव्यास व शाळेत अध्यापनाचे कार्य सुरु असताना मध्येच ऑनलाईन सभा व माहिती मागणे यामुळे दैनंदिन शैक्षणिक कामकाजात अडसर निर्माण केला जातो. तर साप्ताहिक सुट्टीच्या काळात व शाळा सुटल्यानंतर सुद्धा रात्री-बेरात्री माहिती मागितली जाते. माहिती मागण्याच्या अतिरेकी हव्यासामुळे शिक्षकाचे खाजगी आयुष्यात अस्वस्थता निर्माण होत आहे. तसेच अशैक्षणिक कामांसह शैक्षणिक गुणवत्तेच्या नावाखाली अनेकाविध उपक्रमांचा भडीमार विद्यार्थ्यांसह शिक्षकांना त्रस्त करणारा आहे. तर या समाजाभिमुख आणि विद्यार्थी हिताच्या मागणीसाठी शासनाकडे सतत आर्जव करीत असूनही शासन व स्थानिक यंत्रणा दुर्लक्ष करीत आहे. तसेच पुढील शैक्षणिक सत्र सुरु होत असताना विद्यार्थी हिताच्या मागण्यांच्या सोडवणुकीसाठी शासनाने संघटनांसह चर्चा करून आवश्यक धोरणात्मक बदल करावे याकडे लक्ष वेधण्यासाठी धरणे, निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवत्ता पूर्ण शिक्षण दिले जाणार - डॉ. घोष





धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – जिल्हा परिषदेच्या शाळेत सर्व सुविधा देऊन गुणवत्ता पूर्ण शिक्षण दिले जाणार आहे. गुणवत्तेत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनक घोष यांनी दि.१५ जून रोजी केले.

धाराशिव तालुक्यातील आळणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २०२४ – २५ शैक्षणिक सत्राचा प्रवेश उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपसंचालक डॉ गणपत मोरे यांनी प्राथमिक शिक्षण खूप महत्वाचे असून जीवनाच्या जडणघडणीत खूप महत्वाचे आहे. तर पहिली ते चौथीच्या वर्गातील मुलांना शिक्षकांनी जास्तीचे लक्ष देऊन त्यांना घडवावे असे सांगितले. तसेच अशोक पाटील यांनी सर्व शिक्षकांना नवीन शिक्षणिक वर्षाच्या सर्व विद्यार्थी त्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना शुभेच्या दिला. जिल्हा गुणवत्तेत अव्वल ठेवण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न करावेत व मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण द्यावे असे त्यांनी सांगितले. प्रथम नवागत बालकांचे स्वागत सजवलेल्या बैलगाडी व ट्रॅक्टरमधून बँड पथकाच्या निनादात, विद्यार्थ्यांनी लेझीम खेळून सर्व गावातून अतिशय उत्साहात प्रभात फेरी काढण्यात आली. स्वागतासाठी शाळेमध्ये प्रवेशद्वारावर सुबक सुंदर रांगोळी काढण्यात आली होती. क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रमुख पाहुण्यांच्या स्वागता नंतर नवीन पहिलीत प्रवेश झालेल्या मुलांचे स्वागत डॉ घोष, मोरे, पाटील, शहापूरकर, ग्रामीण विकास यंत्रणेचे कार्यक्रम अधिकारी शिक्षण निरीक्षक सराफ यांच्यावतीने करण्यात आले. नवगतांचे स्वागत करताना प्रत्येक मुलांच्या पायाचे ठसे घेऊन मुलाना वर्गात प्रवेश दिला व त्यांना गुलाब पुष्प, चॉकलेट तसेच चित्ररुपी छोटी पुस्तके देण्यात आली. शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. तसेच जेवणाच्या वेळी मसाला पुलाव भात, जिलेबीचा मेनू तयार करण्यात आलेला होता. मुख्याध्यापक बशीर तांबोळी यांनी प्रस्ताविकामद्ये या शाळेत सर्व शिक्षकांच्या मदतीने गुणवंत्ता पूर्ण शिक्षण दिले जाते व या पुढेही सर्वांना गुणवंत्ता पूर्ण शिक्षण दिले जाईल असे सांगितले. यावेळी केंद्र प्रमुख निलेश नागले, शेषराव राठोड, सरपंच प्रमोद वीर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजयकुमार नांदे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष श्याम लावंड, ग्रामपंचायत सदस्य विनोद लावंड, अक्षय कदम, सुनील काळे, किरण कोळी, अंगद भांडेकर, चंद्रकांत राठोड, पद्माकर पाटील, अण्णासाहेब राऊत, मधुकर कोरे, ज्ञानेश्वर निंबाळकर, मनोज वीर, राजाराम राठोड, निलेश निंबाळकर, महेश वीर, महेश कुदळे, बालाजी यादव, सचिन खोबरे, शिवलिंग चौगुले, पूजा पौळ, मुख्याध्यापक बशीर तांबोळी, दिनेश पेठे, उत्तम काळे, वर्षा डोंगरे, सुनिता कराड, मंजुषा नरवटे, सुलक्षणा ढगे, क्रांती मते, सत्यशीला म्हेत्रे, राधाबाई वीर, हनुमंत माने आदींसह शिक्षक, शिक्षिका, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समाजवादी पार्टी येत्या विधानसभा निवडणुकीत ३५ जागा लढविणार - अॅड. भोसले

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – आगामी विधान सभा निवडणुकांमध्ये समाजवादी पार्टीच्यावतीने महाराष्ट्रामध्ये किमान ३५ जागा लढविता येतील असा निर्णय समाजवादी पार्टीच्या मुंबई येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये एकमताने घेण्यात आला असल्याची माहिती समाजवादी पार्टीचे प्रदेश महासचिव तथा प्रवक्ते ॲड रेवण भोसले यांनी दिली.

समाजवादी पार्टीचे सर्व राज्य पदाधिकारी, राज्य कार्यकारणी सदस्य, जिल्हाध्यक्ष व पक्षाच्या विविध आघाडीचे प्रमुख यांची संयुक्त बैठक मुंबईतील बेलार्ड इस्टेट येथील समाजवादी पार्टी मुख्य कार्यालयामध्ये पार पडली. या बैठकीमध्ये समाजवादी पक्षाने नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीमध्ये उत्तर प्रदेशमध्ये लोकसभेच्या ३७ जागा जिंकून जे यश मिळवले. तर देशांमधील पक्ष लोकसभेमध्ये तिसऱ्या क्रमांकावर पोहोचवला त्याबद्दल पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार तथा माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव व उत्तर प्रदेश समाजवादी पार्टीचे अभिनंदन करण्यात आले. तसेच महाराष्ट्रामध्ये समाजवादी पार्टीने एकही जागा न लढविता संविधान बचाव तानाशाही हटाव भूमिकेतून राज्यात सर्वत्र महाविकास आघाडीस मदत केली. प्रभाव असलेल्या ठिकाणी प्रचंड संख्येने मतदान घडून आणले व महाविकास आघाडीच्या यशामध्ये वाटा उचलल्याबद्दल राज्यातील सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तर आगामी विधान सभा निवडणुका राज्यामध्ये निश्चितपणे सत्तापालट घडवणाऱ्या ठरतील असा विश्वास राज्य कार्यकारिणीने एकमताने व्यक्त केला. तसेच समाजवादी पार्टीचे विधानसभा मतदार संघाबाबत तपशीलवार चर्चा झाली. विधान सभा मतदार संघांमध्ये समाजवादी पार्टीच्यावतीने विधान सभेच्या निवडणुका लढविण्यात याव्यात असा निर्णय झाला आहे. तसेच प्रदेशाध्यक्ष आमदार अबू असीम अजमी या संदर्भात पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अखिलेश यादव यांच्याशी



चर्चा करणार असून त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रताप यांच्यासह उपाध्यक्ष डॉ पी.डी. जोशी पाटोदेकर, प्रधान महासचिव परवेज सिद्धीकी, महासचिव डॉ अब्दुल राऊत, डॉ विलास सुरकर, राहुल गायकवाड, साजिदा निहाल अहमद, कल्पना गंगवार आदींसह इतरांनी मार्गदर्शन केले.

## जिल्हा परिषद शाळेमध्ये गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळते - सचिन इगे

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – जिल्हा परिषदेच्या शाळेत दहावी परीक्षेत ९० टक्क्याहून अधिक गुण घेणारे विद्यार्थी आहेत. हे या जिल्हा परिषदेच्या शाळेने सिध्द केले असून ही अत्यंत कौतुकाची व अभिमानाची बाब आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध होते. तसेच जिल्हा परिषद शाळेमध्ये देखील चांगले गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत असल्यामुळे ग्रामीण भागातील पालक व विद्यार्थ्यांचा ओढा जिल्हा परिषद शाळेकडे असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा वित्त अधिकारी सचिन इगे यांनी दि.१५ जून रोजी केले.

धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि) येथील जि. प. प्रशालेमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत व पुस्तकांचे वाटप इगे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सरपंच बळीराम कांबळे, उपसरपंच जयराम मोरे, शालेय समितीचे अध्यक्ष सोमनाथ पाटील, उपाध्यक्ष अभिमान वाडकर, राणी जानराव, सहा. लेखाधिकारी शरद माळी, मुख्याध्यापक व्ही.एच. नाईकवाडे आदी उपस्थित होते. प्रारंभी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांची संपूर्ण गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. तर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप व वृक्षारोपन करण्यात आले. तसेच इगे यांनी शाळेतील




विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची, शाळा परिसराची पाहणी करून शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, दहावीच्या परीक्षेतील निकालाचे व शिष्यवृत्तीधारक यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच शाळेतील विद्यार्थी संख्या वाढवावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शिक्षिका ज्योती राऊत, सरोजा पाटील, सुचिता शेलार, निर्मला गुरव, रजनी रावळे, भूषण मदने आदींसह विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतीला शाश्वत पाणी, २४ तास वीज देण्यासाठी प्रयत्नाची आवश्यकता - खा. राजेनिंबाळकर




धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) – कोणत्याही विकासाच्या योजना या आपल्या भागात राबविल्या जाऊ शकतात का ? याचा विचार करून आश्वासने द्यावी लागतात. अशक्य योजनांची स्वप्ने दाखवून नागरिकांची दिशाभूल करणे अपेक्षित नाही. शेतीवर आधारित उद्योग उभारण्यासाठी शेतीला शाश्वत पाणी व २४ तास वीज देण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दि.१५ जून रोजी केले . धाराशिव जिल्हा पत्रकार संघातर्फे शासकीय विश्रामगृहात आयोजित वातार्लाप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष चंद्रसेन देशमुख, महेश पोतदार आदी उपस्थित होते. पुढे बोलताना खा राजेनिंबाळकर म्हणाले की, जिल्हा हा आकांक्षीत जिल्हा असून ही आपल्यासाठी गौरवाची गोष्ट नाही. जोपर्यंत जिल्ह्यातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढणार नाही. तोपर्यंत हा जिल्हा आकांक्षीत जिल्ह्याच्या यादीतून बाहेर येणार नाही. त्यामुळे दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करावे लागतील असे त्यांनी सांगितले. तर जिल्ह्यात पाण्याचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे आपल्या भागात मोठे उद्योग किंवा कंपन्या येण्यास अडचणी येत असल्यामुळे शेतीवर आधारित उद्योग सुरु करण्यासाठी पुढील काळात प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. तसेच जिल्ह्यात मेडिकल कॉलेज सुरू झाले, धाराशिव-तुळजापूर-सोलापूर रेल्वेमार्गाचे काम सुरू झाले. या कामासाठी खासदार म्हणून सातत्याने पाठपुरावा केला होता व अजूनही हा रेल्वे मार्ग तसेच सुरत-चैन्नई महामार्ग तातडीने पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे हे करताना कोणत्याही शेतकऱ्यावर मावेजा संदर्भात अन्याय होणार नाही, याचीही काळजी घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी त्यांच्या १५ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीचा पट उलगडताना २००९ मध्ये पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आलो, त्यावेळी फारसा अनुभव नव्हता. त्यामुळे शासकीय कामांची प्रक्रिया नेमकी कशी असते ? याबद्दल माहिती नव्हती. पुढे अनुभवाने शिकत गेलो. सुरुवातीच्या काळात शासकीय अधिकाऱ्यांना कामासाठी आक्रमकपणे बोलत होतो. नंतर माझ्या लक्षात आले की त्याचा इमेजवर चुकीचा परिणाम होत असल्यामुळे पुढच्या काळात मी आक्रमकता कमी केल्याचे त्यांनी स्पष्टपणे कबूल केले. तसेच जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न, शेतकरी आत्महत्येचा प्रश्न, बेरोजगारीचा प्रश्न आजही गंभीर असून या प्रश्नांवर प्राधान्याने काम करावे लागेल असे सांगितले. पत्रकारांनी हक्काने जिल्ह्यातील समस्या व प्रश्न मला सांगावेत. त्याचा नक्की पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. पत्रकार हे प्रत्यक्ष ग्राउंडवर उतरून काम करत असतात, त्यात धाराशिवसारख्या ग्रामीण भागातील पत्रकारांचा अभ्यास चांगला असून आपल्या जिल्ह्याच्या विकासासाठी प्रश्न मांडण्याची धमक त्यांच्यात आहे. पत्रकारांच्या दृष्टीला जे दिसते ते इतर कुणाला दिसत नसल्यामुळे पत्रकारांनी वेळोवेळी सूचना कराव्यात असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पत्रकार संघाचे सरचिटणीस भीमाशंकर वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाठक नारीकर, राजाभाऊ वैद्य, संतोष हंबिरे, महेश पोतदार, बालाजी सुरवसे, बालाजी निरफळ, मच्छिंद्र कदम, आरिफ शेख, कालिदास म्हेत्रे, अझर शेख, रहीम शेख, राहुल कोरे, अमजद सय्यद, इस्माईल सय्यद, सलीम पठाण, राकेश कुलकर्णी, सुधीर पवार, सुभाष कदम, सज्जन यादव, कलीम मुसा, आकाश नरोटे, बाळासाहेब अणदुरकर, सयाजी शेळके, अनंत अडसुळ, रवी केसकर, अमोल गाडे, वसंत वाघमारे, बाळासाहेब मुंदडा, राजेंद्रकुमार जाधव, पांडुरंग मते, शिवराज गव्हाणे, कैलास चौधरी, विकास सुर्डी, मनोज मोरे, शीतल मंगल, विनोद कोकाटे, विनोद बाकले, दौलत निपाणीकर आदी पत्रकार उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल :** dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.





# यशवंत

रविवार दि. १६ जून २०२४

# उदगीर

पान ४

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# श्यामलाल हायस्कूल मध्ये प्रवेशोत्सव व क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार सोहळा संपन्न!

उदगीर : येथील श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था अंतर्गत सर्व अस्थापना मध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या पहिल्याच दिवशी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. शाळा उघडण्याचा पहिला दिवस या निमित्ताने शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक भारत खंदारे पर्यवेक्षक राहुल लिमये व ज्येष्ठ शिक्षकांच्या हस्ते पुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले तसेच महाराष्ट्र शासनातर्फे पुरविण्यात आलेल्या इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी माननीय संजय बनसोडे साहेब यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष ॲड.सुपोषपाणि आर्य सर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेत श्यामलाल स्मारक विद्यालयातून सर्वप्रथम आलेल्या सोनटक्के बाजीराव संजय १००%, ढगे रागिनी प्रदीप ९९.८०%, विश्र्वनाथे आकांक्षा महादेव ९९.२०%तसेच शामार्य कन्या विद्यालयातून १०वी बोर्ड परीक्षेत सर्वप्रथम आलेली परगे समीक्षा श्रीकृष्ण ९९%, श्यामलाल ज्युनिअर कॉलेज विज्ञान शाखे मधून सर्वप्रथम बिरादार हर्षदा माधव, द्वितीय गोखले सांची चंद्रगुप्त, तृतीय रुद्रवार अमर संतोष तर कला शाखेतून सर्वप्रथम कसबे गायत्री तुकाराम द्वितीय मदने आशिका प्रमोद तृतीय कसबे रोशनी सोपान या विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट व क्रीडा मंत्री संजय बनसोडे, श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.सुपोषपाणि आर्य, सहसचिव अंजुमनी आर्य, श्यामलाल हायस्कूल चे शालेय समिती सदस्य पंडितराव सुकनिकर, श्यामलाल हायस्कूलचे मुख्याध्यापक भारत खंदारे, श्यामार्य कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तृप्ती ज्ञाते, श्यामलाल प्राथमिक विद्यामंदिर चे मुख्याध्यापक विवेक उगिले, श्यामलाल हायस्कूलचे पर्यवेक्षक राहुल लिमये, श्यामार्य कन्या विद्यालयाचे पर्यवेक्षक प्रवीण भोळे माजी मुख्याध्यापक बालाजी चव्हाण यांच्या हस्ते ८५ % पेक्षा जास्त गुण घेऊन बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार सोहळा प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ, ट्रॉफी व रोख पारितोषिक देऊन गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.





इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे संस्थाध्यक्ष सुपोषपाणि आर्य सर आणि महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे साहेब यांनी शुभेच्छा दिल्या व पुढील शैक्षणिक यशस्वी वाटचालीसाठी समर्पक व योग्य असे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच खरे शिक्षण आणि असे शिक्षण सातत्याने श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न करत आहे हे विविध उपक्रमातून आम्ही पाहत असतो, या संस्थेची ऐतिहासिक पार्श्र्वभूमी आहे एका हुतात्म्याच्या नावावर चालणारी ही शैक्षणिक संस्था तळागाळातील सर्व जाती धर्मातील विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्याचे पवित्र कार्य करत आहे. शेकडो विद्यार्थी विशेष प्राविण्यासह बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण होतात ही अभिमानाची बाब आहे, अनेक गुणवंत कलावंत प्रतिभाशाली विद्यार्थी या शैक्षणिक संस्थेने दिले आहेत व सातत्याने देत आहेत आणि यापुढेही देत राहतील याचा आम्हाला उदगीरचा लोकप्रतिनिधी म्हणून अभिमान आहे असे मनोगत महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे यांनी गुणवंताचा सत्कार सोहळा या कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

संस्थाध्यक्ष ॲड सुपोषपाणि आर्य यांनी कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले. श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था ही सदैव गुणवत्ता विकास व सर्वांगीण विकास हे ध्येय उराशी बाळगून सातत्याने शिक्षण क्षेत्रामध्ये आपल्या कार्याचा उत्कृष्ट ठसा उमटवीत आहे याचे तुम्ही आम्ही प्रत्यक्ष साक्षीदार आहोत, गेल्या अनेक वर्षापासून संस्था अंतर्गत सर्व आस्थापनामध्ये जास्तीत जास्त उत्कृष्ट निकाल लावण्याची उज्वल यशाची परंपरा या संस्थेने आजतागायत कायम ठेवली आहे यामागे संस्था प्रशासन, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी,पालक या सर्वांचे योगदान मोलाचे आहे, विद्यार्थ्यांनी पुढील शैक्षणिक कालावधीमध्ये आपणास हवे ते करिअर घडवावे पन आपली मातृभूमी आपले पालक आपली आई आपले कुटुंब यांचा कधीही विसर पडू देऊ नये, आपला देश आपली संस्कृती यांचे महत्त्व वाढेल असे वर्तन विद्यार्थ्यांनी ठेवावे असे मार्गदर्शन केले.

गुणवंतांचा सत्कार सोहळा या कार्यक्रमाचे प्रभावीपणे प्रास्ताविक पर्यवेक्षक प्रवीण भोळे यांनी केले तर कार्यक्रमाचे व्यवस्थितरित्या सूत्रसंचालन, मान्यवरांच्या सत्कार सोहळ्याचे नियोजन उमाकांत सूर्यवंशी, मदन पाटील, हुरदळे संतनप्पा यांनी केले, स्वागतगीत श्यामार्य कन्या उच्च माध्यमिक विद्यालय मुलींचा संघ यांनी सादर केले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतिष बिरादार, सईद शेख, हके नामदेव, राजकुमार बिरादार, दिनेश बोळेगावे,महेश हुलसुरे, बस्वराज स्वामी, समाधान कांबळे, गोपाळ रेड्डी,देशमुख संगीता, रोडगे शैलज्जा, होन्ना प्रेमा, वैशाली अनकल्ले, चंदे अंजली, निडवंचे श्रीहरी, मोरतळे स्वाती इत्यादींनी मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे आभार व्यक्त करण्याचे कार्य मुख्याध्यापक भारत खंदारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला. प्रवेशोत्सव व शाळा उघडण्याचा पहिला दिवस या निमित्ताने शालेय परिसरात महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय बनसोडे, संस्थाध्यक्ष ॲड. सुपोषपाणि आर्य, सहसचिव अंजुमनी आर्य, संस्था सचिव ॲड विक्रम संकाये, व्ही. एस. कुलकर्णी, रामभाऊ मोतीपवळे, शाळेचे मुख्याध्यापक भारत खंदारे, तृप्ती ज्ञाते, विवेक उगिले, पर्यवेक्षक राहुल लिमये, प्रवीण भोळे, हरितसेना प्रमुख अविनाश घोळवे यांच्या हस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण करून वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

## शैक्षणिक कामासाठी आवश्यक प्रमाणपत्रांच्या वितरणासाठी १८ जूनपासून विशेष शिबिरांचे आयोजन

लातूर / प्रतिनिधी- इयत्ता दहावी, बारावीचा निकाल जाहीर झाला असून विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेशासाठी विविध दाखले, प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. असे दाखले विद्यार्थ्यांना शाळेतच किंवा जवळच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी महाराजस्व अभियान अंतर्गत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर तालुक्यात १८ जून ते २ जुलै या कालावधीत १८ ठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दिली.महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करण्यासाठी दरवर्षी महाराजस्व अभियान राबविण्यात येते. या अभियानांतर्गत दहावी, बारावी झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला, आर्थिक दुर्बल घटकांचे प्रमाणपत्र, ईडब्लूएस, एसईबीसी प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर, तसेच इतर शैक्षणिक दाखल्यांचे वितरण करण्यासाठी त्यांच्या शाळेच्या ठिकाणी किंवा निवासाचे जवळच विशेष शिबिरांचे आयोजन केले जाते.

## लाल बहादूर शास्त्री विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षात नवागतांचे स्वागत व पुस्तक वितरण



उदगीर दि.१५ येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३- २४ च्या पहिल्या दिवशी नवागतांच्या स्वागताचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शाळेचा पहिला दिवस असल्याने प्रवेशद्वार व फलक सुशोभित करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी मंचावर स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे ,विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले ,उपमुख्याध्यापक संजय कुलकर्णी ,पर्यवेक्षक कृष्णा मारावार, राजकुमार म्हेत्रे ,माधव मठवाले उपस्थित होते.

विद्यालयाच्या परिसरात शंकरराव लासुणे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांनी मनोगत व्यक्त करताना पहिल्याच दिवशी उत्साहात शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यक्रम प्रमुख आशा गौतम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

## अक्षरनंदन प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत



उदगीर/ प्रतिनिधी- येथील उपक्रमाशील असा अक्षरनंदन मराठी प्राथमिक शाळेत शाळेच्या पहिल्या दिवशी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन फुले टाकून स्वागत करण्यात आले तसेच याप्रसंगी विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थी व शिक्षक पालक उपस्थित होते शाळेचा पहिला दिवस म्हणून विद्यार्थ्यांना गोड खाऊ देण्यात आला तसेच उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले या वेळी प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री शिवशंकर जिवणे सरांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## माझं उदगीर हरित उदगीर विद्या वर्धिनी शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण

उदगीर /प्रतिनिधी - येथील किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित विद्यावर्धिनी हायस्कूल, प्राथमिक, इंग्रजी व मराठी, सेमी माध्यमातील विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर( घुगे) यांच्या शाळेतील पहिले पाऊल वृक्ष लावून या उपक्रमाला भरभरून प्रसिद्ध देत शाळेच्या पहिल्या दिवशी वृक्ष लागवड मोहिमेला गती देण्यासाठी एक मूल एक झाड अशी संकल्पना शाळेत राबवली आहे. इयत्ता पहिली व पाचवी वर्गात नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा व पालकांचा गुलाब पुष्प,पेढे भरून ढोल ताशाच्या गजरात सर्व



शैक्षणिक संकुलातील गुरुजींनी स्वागत केले.स्वागतानंतर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. यावेळी पृथ्वीराज पाटील एकंबेकर,विद्यावर्धिनी हायस्कूलचे मुख्याध्यापक व्ही.एम बांगे, पर्यवेक्षक राम ढगे, उप मुख्याध्यापक बी.बी नागरवाड, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिलीप हनमंते, कलाशिक्षक एन. आर जवळे,परीक्षा विभाग प्रमुख बाबासाहेब पाटील, बंडू पाटील लोणीकर,व्ही.एस कणसे, के.एम राजूरकर, मृदुला पाटील, नागनाथ गुट्टे यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक यांची यावेळी उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.व्ही बिरादार यांनी केले तर आभार अविनाशपोशेट्टी यांनी मानले.



## श्री अनंतपाळ वाचनालयात लातूरचे खासदार डॉ.शिवाजी काळगे यांचा सत्कार

शिरूर अनंतपाळ :-शहरातील श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालयात शिरूर अनंतपाळ तालुक्याचे भूमिपुत्र लातूरचे नवनिर्वाचित खासदार डॉ.शिवाजी काळगे यांचा सत्कार वाचनालयाचे अध्यक्ष श्री एल. बी. आवाळे यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी वाचनालयाचे उपाध्यक्ष सौ. सुनिता देवसटवार, चिटणीस डॉ. राजकुमार बोपलकर, उपचिटणीस सौ.पदमा यरमलवार, कोषाधक्ष श्री सुरेश कोटलवार,सदस्य श्री सत्यनारायण बंग, सदस्या सौ.उज्वला लादे,सदस्या सौ. नंदा वकील,श्री विरभद्र भातांब्रे,ग्रंथपाल काशिनाथ बोडके, सहाय्य्क ग्रंथपाल सौ. शिवनंदा चौसस्टे, अनंत सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

## सैनिकी विद्यालयात डॉ सागर रकटे व डॉ. अमृता रकटे यांच्या हस्ते वृक्षारोपण संपन्न



उदगीर/ प्रतिनिधी- श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात डॉ. सागर रकटे व डॉ. अमृता रकटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

डॉ. सागर व डॉ. अमृता रकटे हे कलकत्ता येथील टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल येथे आपली सेवा देण्याचे महान कार्य करत आहेत.

दि. १४ जून २०२४ रोजी डॉ. रकटे दाम्पत्यांनी सैनिकी विद्यालयास सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. डॉ. सागर रकटे म्हणाले, सैनिकी विद्यालयाचा परिसर व येथील लावलेली झाडे पाहून आम्ही खूप आनंदी झालो आहोत.

विद्यालयाचे प्राचार्य वसंत कुलकर्णी यांनी डॉ. सागर रकटे यांचा सत्कार केला तर डॉ.अमृता रकटे यांचा सत्कार सहशिक्षिका उज्वला वडले यांनी केला. डॉ. अमृता ही राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस तथा कर्मवीर भाऊराव पाटील शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बसवराज म. पाटील नागराळकर साहेब यांची भाची आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड यांनी केले तर आभार पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के यांनी मानले. यावेळी विद्यालयातील सर्वच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## संदीप स. पवार यांना राष्ट्रीय महर्षी पतंजली योग रत्न पुरस्कार

उदीगर / प्रतिनिधी- अखिल भारतीय योग शिक्षक महासंघ ने योग महाकुंभ २०२४ मध्ये राममय से योग मय हा ब्रिद घेऊन उत्तर प्रदेश येथील अयोध्या धाम च्या श्री रामलीला संस्कृतीक सभागृहात दि १३ व १४ जुन २०२४ रोजी च्या आयोजित कार्यक्रमामध्ये योग क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा राष्ट्रीय महर्षी पतंजली योग रत्न पुरस्कार संदीप सखाराम पवार - राष्ट्रीय पंच यांना प्रदान करण्यात आले.

संदीप स. पवार हे राष्ट्रीय पंच व सखा क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा कराटे आसोसिएशन व योग कल्चर आसोसिएशन लातूर, सेवा फाउंडेशनचे अध्यक्ष, तसेच अ.भा.योग,शिक्षक महासंघ, राज्य सचिव, आणि क्रीडा संचालक, क्रीडा मार्गदर्शक आहेत, व त्यानी, सखा क्रीडा मंडळ च्या माध्यमातून विविध स्पर्धे मध्ये राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय खेळाडू घडवले आहेत आणि शहर व ग्रामीण भागातील लोकांना मोफत योग प्रशिक्षण शिबिर घेऊन लहान मुलांपासून ते जेष्ठ नागरिकांना योग प्राणायाम ध्यान, व आरोग्य, आहार, स्वास्थ, सूर्यनमस्कार, योगासने यांचे महत्त्व गेल्या सोळा वर्षां पासुन सातत्याने अविरत चालू आहे व योगासनांच्या स्पर्धा आयोजित करुन लहान मुलांनपासुन ते वयो वृद्ध, जेष्ठ व्यक्तीना ही स्पर्धेत सहभागी करून तांच्यात योगासनांची आवड निर्माण करण्याचे काम करत आहेत व योग शिक्षक महासंघाच्या माध्यमातून ग्रामीण भागात जाऊन योग शिबिर घेऊन योगाचे महत्त्व सांगुन प्रचार प्रसार व समाजातील लोकांना निरोगी , सदृड बनवण्यासाठी अविरत समाज कार्य करत आहेत म्हणून.

राष्ट्रीय एकात्मता, योग प्रसार प्रचार, सशक्त भारत योग मय भारत घडवण्यासाठी योगदान देत असल्याने योग क्षेत्रात भरीव आणि अग्रेसर कार्य केल्याने राष्ट्रीय महर्षी पतंजली योग रत्न पुरस्काराने संदीप सखाराम पवार यांना बाली इंडोनेशिया आश्रम गांधी पूरी सेवाग्राम चे अध्यक्ष पद्मश्री अगुस इन्द्र उदयन, माजी उप मुख्यमंत्री दिनेश शर्मा ,वेद मूर्ति पवन दत्त महराज, राष्ट्रीय अध्यक्ष मंगेश त्रिवेदी, यांनी पुरस्कार देउन सन्मानित केले.!

